Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1**

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# उच्च शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षा यातील सहसंबंधाचा अभ्यास

**श्री. राहुलकुमार विनायकराव पाटील,** संशोधक विद्यार्थी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे,** सहायक प्राध्यापक, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात उच्च शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेतील सहसंबंधाचा अभ्यास वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण संशोधन पद्धतीने करण्यात आले आहे. एकूण १७० विद्यार्थिनींचा सहेतुक नमुना निवडण्यात आला. शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेचे मापन करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित शोधिका वापरली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला आहे. निष्कर्ष- व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वकांक्षा शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण विद्यार्थिनींपेक्षा अधिक दिसून येते. व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेमध्ये उच्च आणि सकारात्मक सहसंबंध दिसून येतो. शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेमध्ये देखील उच्च आणि सकारात्मक सहसंबंध दिसून येतो.

**प्रस्तावना**

महात्मा जोतिबा फुले यांनी भारतात स्त्री शिक्षणाची नींव रचली आणि त्याच वेळी भारतीय समाजाची खरी गरज ओळखून स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनी शिक्षण सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व समजून, त्यासाठी विविध प्रयत्न केले, कारण त्यांचे मत होते की, महिलांना शिक्षित केल्यास संपूर्ण समाजाचा विकास होईल. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाचा, शैक्षणिक तसेच सामाजिक दृषटिकोनातून अत्यंत महत्त्व आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शहरी विद्यार्थ्यांपेक्षा वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करावा लागतो. तथापि, आजकाल ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात अनेक सकारात्मक बदल होत आहेत. महिला शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती करत असताना, त्या आपल्या व्यावसायिक क्षेत्रातील महत्वाकांक्षेवर देखील भर देत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षा विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांवर आधारित असतात. शैक्षणिक अभिरुची म्हणजे त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील आवड, शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये गुंतवणूक आणि यशाकडे जाण्याची दिशा. शैक्षणिक अभिरुची विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा आणि आत्मविश्वासाचा प्रतिबिंब असते, जे त्यांना शैक्षणिक यशाच्या दिशेने प्रोत्साहित करते. त्याचप्रमाणे, व्यावसायिक महत्वाकांक्षा म्हणजे त्या विद्यार्थिनींची एक मानसिकता जी त्यांना भविष्यातील करियरची दिशा ठरवते. या महत्वाकांक्षेचे मूल्यांकन करत असताना, त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितींचाही विचार केला जातो. व्यावसायिक महाविद्यालयांमधील विद्यार्थिनींमध्ये उच्च स्तराची व्यावसायिक महत्वाकांक्षा असते, कारण त्या आपल्या करियरसाठी एक ठोस दिशा आणि महत्त्व देतात. समाजातील महिलांच्या शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रातील सहभागाची आवश्यकता लक्षात घेतल्यास,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेतील सहसंबंध विद्यार्थिनींच्या भविष्यातील यशासाठी महत्त्वपूर्ण ठरतो. ज्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक दृषटिकोनामध्ये स्पष्टता असते, त्यांची व्यावसायिक महत्वाकांक्षाही अधिक ठोस आणि केंद्रित असते. या संशोधनाचा उद्देश आहे शैक्षणिक महाविद्यालयांमध्ये असलेल्या ग्रामीण विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रेरणा, मूल्ये आणि व्यावसायिक दृषटिकोनावर प्रकाश टाकणे. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक भविष्याची दिशा समजून घेणे आणि संस्थांच्या शैक्षणिक कार्यप्रणाली सुधारण्यासाठी उपयुक्त सूचना देणे, यासाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरते.

**समस्या विधान**

धुळे जिल्ह्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षा यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

1. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
2. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
3. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
4. शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती**

- **संशोधन पद्धती** - प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.
- **जनसंख्या** – प्रस्तुत संशोधनात धुळे जिल्ह्यातील व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेशित सर्व ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थिनीची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

- **न्यादर्श** – प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीने धुळे जिल्ह्यातील व्यावसायिक महाविद्यालयातील ९० व शैक्षणिक महाविद्यालयातील ८० असे एकूण १७० ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थिनीची निवड करण्यात आली.
- **संशोधन साधने** - प्रस्तुत संशोधनात माहितीचे संकलन करण्यासाठी खालील संशोधन साहित्याचा अवलंब करण्यात आला.

1. **शैक्षणिक अभिरुची शोधिका** - व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीचे मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित शैक्षणिक अभिरुची शोधिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण २५ विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. सदर शोधिका तज्ञ मार्गदर्शक व मानसशास्त्र विषय शिक्षकांकडून तपासून घेण्यात आली आहे.
2. **व्यावसायिक महत्वाकांक्षा मापिका** - व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वाकांक्षा मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित शैक्षणिक अभिरुची शोधिकेचा अवलंब केला आहे. त्यात एकूण ३० विधाने होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. सदर शोधिका तज्ञ मार्गदर्शक व मानसशास्त्र विषय शिक्षकांकडून तपासून घेण्यात आली आहे.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे** - प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व टी मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब करण्यात आला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**


प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी स्वनिर्मित प्रश्नावल्या विद्यार्थिनीना देण्यात आल्या होत्या. त्यास दिलेल्या प्रतिसादावरून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आल्या.

**परिकल्पना ०१:** व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

| शैक्षणिक अभिरुची | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थीनी | ९० | ४३.६५ | ३.६३ | 2.00 | ४.०७ | त्याग |
| शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थीनी | ८० | 41.३६ | ३.६९ | | | |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I




**विश्लेषण व अर्थनिर्वचन**


स्वाधीनता मात्रा (१६८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य ४.०७ असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची मध्यमान गुणांक हा शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

**परिकल्पना ०२:** व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

| व्यावसायिक महत्वाकांक्षा | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थीनी | ९० | ५१.३६ | ४.८५ | 2.00 | २.८० | त्याग |
| शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थीनी | ८० | 49.३३ | ४.५६ | | | |


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I




**विश्लेषण व अर्थनिर्वचन**

स्वाधीनता मात्रा (१६८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर टेबल 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त मूल्य २.८० असून ते टेबल 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेचा मध्यमान गुणांक हा शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वाकांक्षा शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.

**परिकल्पना ०३:** व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

| **व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थी** | **N** | **Table 'r' value** | **Obtained 'r' value** | **निर्णय** |
|---|---|---|---|---|
| शैक्षणिक अभिरुची | ९० | .२१६ | .751 | त्याग |
| व्यावसायिक महत्वाकांक्षा | ९० | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की प्राप्त **'r'** मूल्य ०.०५ स्तरावर टेबल **'r'** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. (**r** = ०.७५१ हा उच्च आणि सकारात्मक सहसंबंध आहे.)

**परिकल्पना ०४:** शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

| **शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थी** | **N** | **Table 'r' value** | **Obtained 'r' value** | **निर्णय** |
|---|---|---|---|---|
| शैक्षणिक अभिरुची | ८० | .२१६ | .711 | त्याग |
| व्यावसायिक महत्वाकांक्षा | ८० | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की प्राप्त **'r'** मूल्य ०.०५ स्तरावर टेबल **'r'** मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. (**r** = ०.७११ हा उच्च आणि सकारात्मक सहसंबंध आहे.)

**निष्कर्ष**

1. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुचीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.
2. व्यावसायिक व शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वकांक्षेच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची व्यावसायिक महत्वाकांक्षा शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीपेक्षा अधिक दिसून येते.
3. व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. (**r** = ०.७५१ हा उच्च आणि सकारात्मक सहसंबंध आहे.)
4. शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षा यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. (**r** = ०.७११ हा उच्च आणि सकारात्मक सहसंबंध आहे.)

**निष्कर्ष व चर्चा**

व्यावसायिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुचीत शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींपेक्षा अधिक फरक दिसून येतो. याचा अर्थ असा की, व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींमध्ये शैक्षणिक उद्दिष्टे व यश साधण्याची अधिक इच्छा असू शकते. यासाठी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कारण असू शकते की, व्यावसायिक क्षेत्राची निवडक शिस्त, करियरच्या संधी आणि स्थानिक आवश्यकतांची पूर्तता यामुळे त्या विद्यार्थिनींचा शैक्षणिक दृष्टिकोन अधिक विकसित होतो. व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या व्यावसायिक महत्वाकांक्षेत अधिक गती आहे. शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थिनींपेक्षा त्यांच्या कारकीर्दीच्या दृष्टीने वेगवेगळ्या संधींचा शोध घेतला जातो. व्यावसायिक महाविद्यालयात असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमामुळे विद्यार्थिनींची महत्वाकांक्षा अधिक ठळकपणे वाढते. यामुळे, त्या आपल्या करियरच्या दिशेने ठोस पावले उचलू शकतात. ज्या विद्यार्थिनींना शैक्षणिक पातळीवर उच्च उद्दिष्टे आहेत, त्यांना व्यावसायिक क्षेत्रामध्ये सुद्धा उच्च महत्वाकांक्षा असू शकते. शैक्षणिक यशाकडे एक सकारात्मक दृषटिकोन असणाऱ्या विद्यार्थिनींची व्यावसायिक यशाकडे सुद्धा सकारात्मक दृषटिकोन असतो. शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुची आणि व्यावसायिक महत्वाकांक्षेतील सहसंबंध (r = ०.७११) सुद्धा उच्च आणि सकारात्मक आहे, म्हणजेच शैक्षणिक आणि व्यावसायिक उद्दिष्टे परस्परांना प्रोत्साहन देणारी असतात. याचा अर्थ शैक्षणिक महाविद्यालयातील विद्यार्थिनी आपल्या करियरला महत्त्व देत असल्या तरी त्यांना शैक्षणिक क्षेत्रातही उच्च यशाची इच्छाशक्ती असू शकते. व्यावसायिक आणि शैक्षणिक महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक अभिरुची व व्यावसायिक महत्वाकांक्षेमध्ये सकारात्मक सहसंबंध आहे. यावरून हे दिसून येते की शैक्षणिक आणि व्यावसायिक उद्दिष्टांमध्ये एकमेकांचा परस्परांशी संबंध आहे, जे विद्यार्थिनींच्या मानसिकतेत आणि करियरच्या दिशेने जाऊन यशाच्या कक्षेत बदल घडवू शकते.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. Best & Kahn. (2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.
2. Bhandari, R., & Smith, F. J. (1997). Rural women in India: Assessment of educational constraints and the need for new educational approaches. Journal of Research in Rural Education, 13, 183-196.
3. Garrett, H .E. (2006). Statistics in Psychology & Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.
4. Kang, L. S., & Kaur, G. (2021). Contextual support and career aspirations of working women. South Asian Journal of Human Resources Management, 8 (1), 54-78.
5. Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.
6. Meece, J. L., Askew, K. J., Agger, C. A., Hutchins, B. C., & Byun, S. Y. (2014). Familial and economic influences on the gender-related educational and occupational aspirations of rural adolescents. Journal of educational and developmental psychology, 4 (1), 238.
7. Raja Kumar, P. G. (2013). Research Methodology (1st Ed.). Delhi: APH Publishing Corporation.


Copyright © | JET Network, All Rights Reserved